# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

## // विशेष महासभा बैठकीचे कार्यवृत्त //

**सभा क्रं. - ४०** **दि. ०८/०८/२०२२**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.०८/०८/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.महाजन जयश्री सुनिल यांचे अध्यक्षतेखाली प्रत्यक्ष उपस्थितीने झालेल्या विशेष महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करून खालील सन्मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.महाजन जयश्री सुनिल, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| पाटील कुलभुषण विरभान, उपमहापौर | पाटील सचिन भिमराव | महाजन सुनिल सुपडु |
| जोहरे प्रिया मधुकर | चौधरी मनोज सुरेश | शेख शबानाबी सादीक |
| नेरकर सरीता अनंत | पाटील चंद्रशेखर शिवाजी | नाईक प्रशांत सुरेश |
| पोकळे दिलीप बबनराव | कापसे प्रतिभा चंद्रकांत | बालाणी भगतराम रावलमल |
| खान रुकसानाबी गबलु | देशमुख प्रतिभा गजानन | अत्तरदे रजनी प्रकाश |
| सोनवणे कांचन विकास | पाटील विजय पुंडलिक | काळे रेश्मा कुंदन |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | सोनवणे सुरेश माणिक | आहुजा मनोज नारायणदास |
| शिंदे गायत्री उत्तम | बारी शोभा दिनकर | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| बाविस्कर किशोर रमेश | शेख हसीनाबी शरिफ | सोनार रंजना विजय |
| सपकाळे मिना धुडकु | भिल पार्वताबाई दामु | खडके सुनिल वामनराव |
| कोळी दत्तात्रय देवराम | पाटील उषा संतोष | खडके विश्वनाथ सुरेश |
| सपकाळे रंजना भरत | कोल्हे ललीत विजय | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| कोल्हे प्रविण रामदास | बरडे नितीन मनोहर | देशमुख सुन्नाबी राजु |
| सोनवणे भारती कैलास | बेंडाळे उज्वला मोहन | शेख सैईदा युसुफ |
| भंगाळे विष्णु रामदास | राणे गायत्री इंद्रजित | पटेल इब्राहिम मुसा |
| सोनवणे राखी शामकांत | जोशी अनंत हरिश्चंद्र | सोनवणे निता मंगलसिंग |
| तायडे ज्योती शरद | तायडे सुरेखा नितीन | सोनवणे विक्रम किसन |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | चव्हाण ज्योती बाळासाहेब | **स्विकृत सदस्य** |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | मराठे जितेंद्र भगवान | कैलास नारायण सोनवणे |
| सोनवणे धीरज मुरलीधर | पाटील रेखा चुडामण | विशाल राधेशाम त्रिपाठी |
| काळे दिपमाला मनोज | ढेकळे सदाशिव गणपत | राजेंद्र नारायण मराठे |
| सोनवणे अश्विन शांताराम | पाटील राजेंद्र झिपरु | महेश रतन चौधरी |

सदर सभेस मा.आयुक्त, डॉ.विद्या गायकवाड, मा.अतिरीक्त आयुक्त श्री.शाम गोसावी, नगरसचिव, श्री.सुनिल गोराणे, मा.उपायुक्त श्री.प्रशांत पाटील, मुख्यलेखाधिकारी, श्री.चंद्रकांत वानखेडे, तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**मा.महापौर :-** नगरसचिव यांनी विशेष महासभेचा कामकाज सुरु करावा.

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.**

**सभेच्या सुरूवातीस वंदेमातरम ने सुरूवात करण्यात आली.**

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सभागृहाचा स्वागत आहे. आजच्या सभेकरीता सन्मा.सदस्य १) कापसे मयुर चंद्रकांत, तसेच २) सन्मा.सदस्या चौधरी चेतना किशोर, ३) चौधरी मंगला संजय, ४) भोळे सिमा सुरेश, ५) भोईटे लताबाई रणजित, ६) कोल्हे सिंधु विजय, ७) सोनवणे अंजनाबाई प्रभाकर यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी महोदया यांनी मंजूर केलेले आहेत.

**नगरसचिव :- विषय क्रं:- १)** १)महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण ८२२२/प्र.क्र.११० (भाग-२)/ सां.का.४, दि.२० जून २०२२, २)शासन निर्णय क्र.संकीर्ण ८२२२/प्र.क्र.१६१/सां.का.४,दि.३० जून २०२२, ३)शासन परिपत्रक क्र.संकीर्ण ८२२२/प्र.क्र.११०(भाग-२) /सां.का.४, दि.२० जुलै २०२२ अन्वये "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत "हर घर तिरंगा" व "स्वराज्य महोत्सव" उपक्रम राबविणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावाची माहिती घेणे.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर, मा.उपमहापौर, सर्व सन्मा.सदस्य व सर्व अधिकारी बंधु, भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्ष पुर्ण होत आहे. या गौरवशाली परवा निमित्त दि.१२ मार्च २०२१ ते दि.१५ ऑगस्ट २०२३ या कालावधीमध्ये आजादी का अमृत महोत्सव या उपक्रमाचे आयोजन करणेबाबत केंद्र शासनाने सर्व राज्यांना कळविलेले आहे. त्यानुसार राज्यात सदर कार्यक्रमध्ये भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करणेबाबत शासन निर्णय शासन परिपत्रक शासन पत्राद्वारे वेळोवेळी सुचना देण्यात आलेल्या आहेत. व त्यानुसार देशभक्तिची भावना जागृत व्हावी व त्याचे ज्वालंत स्मरण व्हावे म्हणुन त्या अनुषंगाने भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव दि.०९ ऑगस्ट २०२२ ते दि.१७ ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये करायचे आहे. स्वराज्य महोत्सव अंतर्गत विविध उपक्रम कार्यक्रम यांचे स्वरुप निश्चित केलेले आहे. त्यानुसार स्वराज्य महोत्सव अंतर्गत विविध कार्यक्रम उपक्रमाचे विशेष वृत्त्या तसेच जास्तीत जास्ती जनसंपर्कातुन आयोजन करण्यात आलेले आहे. या अनुषंगाने जळगांव शहर महानगरपालिकेने आपली पुर्वतयारी केलेली आहे. यामध्येही विशेष कार्यक्रम दि.१३ ऑगस्ट २०२२ ते दि.१५ ऑगस्ट २०२२ हे तीन दिवस आपल्याला हर घर तिरंगा लावायचा आहे. हा तिरंगा प्रत्येक नागरीकाने विकत घेवुन आपल्या घरी लावायचा आहे. यासाठी आपण सर्व नागरीकांना विविध १४ ठिकाणी स्टॉल उपलब्ध करुन देणार आहे. बचत गटाच्या मार्फत जनसहभागातुन आपल्याला हे तिरंगा घ्यायचा आहे आणि आपल्या घरावर लावायचा आहे. या मध्ये सर्व सन्मा.सदस्यांना, सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना माझी विनंती आहे की, महानगरपालिकेच्या जे काही उपक्रमाचा आयोजन केलेला आहे. त्यामध्ये सर्वांनी सहभाग घ्यावा आणि हा आपला स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव जळगांव महानगरपालिका अंतर्गत अतिशय उत्साहाने आणि सन्मानाने साजरा करु आता मी गोसावी साहेबांना विनंती करते की, त्यांनी या विषयी डिटेल माहिती सांगावी.

**श्री.शाम गोसावी, अति.आयुक्त :-** मा.आयुक्त महोदया, सर्व सन्मा.नगरसेवक, अधिकारी बंधु आणि बघिणींनो, आजादी का अमृत महोत्सव स्वातंत्र्याला ७५ वर्ष झाले, केंद्र व राज्य शासनाने हर घर तिरंगा व स्वराज्य महोत्सवाचे आयोजन करणेचे निर्देश देण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने जळगांव शहरात मनपा मार्फत विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन या स्वराज्य महोत्सवामध्ये सगळे सहभागी होत आहोत. हर घर तिरंगा या अंतर्गत दि.१३ ऑगस्ट २०२२ ते दि.१५ ऑगस्ट २०२२ या कालावधी मध्ये शासकीय, निम-शासकीय, खाजगी आस्थापना आणि प्रत्येक घरावर तिरंगा ध्वज उभारायचा आहे. आणि यासाठी आपल्या शहरातील १५०० बचतगटाचा जळगांव शहर वस्तीस्तर संघ, या संघाला आमंत्रित करुन जळगांव शहरातील शिलाई काम करणारे ३५० ते ४०० कुटुंबांना यामध्ये इन्वॅल्व करुन आपण तिरंगा ध्वजाची निर्मीती केलेली असुन जळगांव शहर वस्तीस्तर संघामार्फत ५० हजार ध्वजांची निर्मीती ही आपल्या स्थानिक बचत गटामार्फत करुन ३५० ते ४०० कुटुंबांना रोजगार उपलब्ध करुन दिलेले आहे. यासाठी आपण १४ ठिकाणी स्टॉलची निर्मीती करण्यात येत असुन त्याद्वारे नागरीकांना तिरंगा राष्ट्रध्वज उपलब्ध करुन देणार आहे. सदर बचतगटाने तयार केलेले आजतागायत २० हजार तिरंगा ध्वजाची विक्री सुध्दा पार पडलेली आहे. तसेच आपण सर्वांनी यामध्ये सहभागी व्हायचे आहे. आपल्या प्रत्येक वार्डामध्ये तिरंगा ध्वज उभारायचे आहे आणि सर्व नागरीक सहस्फुर्तीने या उपक्रमामध्ये सहभागी होतील. तसेच काय करावे काय करु नये याचेही बॅनर आपले मनपामार्फत सर्व प्रभागांमध्ये लावण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. स्वराज्य महोत्सव अंतर्गत शासन आदेशानुसार जे कार्यक्रम देण्यात आले होते त्यानुसार आज दि.०८ ऑगस्ट २०२२ रोजी महासभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. तसेच दिनांक निहाय हा कार्यक्रम ०८ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट असे अंमलबजावणी करायची आहे. आणि सर्वांनी स्वयंस्पुर्तीने सहभागी व्हायचे आहे. दि.०८ ऑगस्ट २२ रोजी महासभेचे आयोजन तसेच जळगांव शहर वस्तीस्तर संघाची बैठक घेण्यात येत असुन या अंतर्गत ९००० कुटुंबांना या उपक्रमा विषयी जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच ०९/०८/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता सामुहिक राष्ट्रगीताचे गायन करण्यात येत असुन मनपातील सर्व संबंधीत कार्यालय,

मनपा प्रशासकीय इमारत व सर्व शाळा व महाविद्यालय व सर्व शासकीय कार्यालयामध्ये ११.०० वाजता राष्ट्रगीताचे गायन करुन आपल्याला एक विश्वविक्रम करायच आहे. याचेही मनपातर्फे आयोजन करण्यात आलेले आहे. तसेच दि.०९/०८/२०२२ ला सर्व प्रभाग अधिकारी यांनी हर घर तिरंगा व स्वराज्य महोत्सवाबाबत वार्ड आंगाई बैठका व चर्चासत्र वार्ड निहाय आयोजन करायचे आहे. तसेच दि.१०/०८/२०२२ ला सर्व शाळांमध्ये २०० शाळा असुन २५०० विद्यार्थी यामध्ये सहभागी होणार आहे. स्वच्छता अभियान, चित्रकला स्पर्धा आणि हर घर तिरंगा ही व्यापक स्वरुपात सर्व शाळांमध्ये मोहिम राबविली जाणार आहे. तसेच दि.१०/०८/२०२२ रोजी आपल्या मनपाच्या आरोग्य विभागातर्फे सर्व वार्डांमध्ये स्वच्छता मोहिमेचे आयोजन केलेले आहे. यामध्ये महावीर नगर दुध फेडरेशन, शिवाजी नगर स्मशानभुमी परिसर, ममुराबाद रोड, शिवाजी नगर, योगेश्वर नगर, हनुमान मंदिराजवळ, रामपेठ श्रीराम मंदिर परिसर, टॉवर चौक एम.जी.रोड, प्रताप नगर, ट्रॉफिक गार्डन, गणेश कॉलनी चौक, ख्वॉजामियॉ रोड, खोटेनगर, नॅशनल हायवे, विद्यानगर, भवानी रोड, पिंप्राळा चौक, सोमाणी मार्केट, रामानंद नगर बस स्टॉप, काव्यरत्नावली चौक, मेहरुण चौपाटी, राम रहिम नगर, साईबाबा मंदिर, लाठी शाळा, शांतीनिकेतन हाऊसींग सोसायटी, गणेशपुरी, अशोक किराणा परिसर, या ठिकाणी आपण श्रमदान करणार आहोत लोक सहभागातुन आणि लोक सहभागातुन सदर परिसर स्वच्छ करणार आहोत. तसेच दि. ११/०८/२०२२ रोजी सकाळी ७.०० वाजता मॅरेथॉन स्पर्धेचा आयोजन करण्यात आलेला आहे. सदर मॅरेथॉन रॅली ही सकाळी ७.०० वाजता मनपा प्रशासकीय इमारतीपासुन सुरु होऊन काव्यरत्नावली चौक पर्यंत मॅरेथॉन स्पर्धा राहणार आहे. तसेच दि.११/०८/२०२२ ला सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये क्रिडा स्पर्धांचे आयोजन केलेले आहे. दि.१०/०८/२०२२ रोजी महिला मेळावा तसेच आरोग्य शिबीराचे आयोजन केलेले असुन महिला बचतगट मेळाव्यामध्ये भारतीय स्वातंत्र्याचा लढा व या मधील महिलांचे योगदान या विषयी मार्गदर्शन करण्यात येणार असुन हे उपक्रम झ ाल्यानंतर आरोग्य शिबीराचे ही आयोजन करण्यात आलेले आहे. आरोग्य शिबीरामध्ये आर.एल.मल्टी स्पेशॅलीटी हॉस्पीटल, मनपा दवाखाना विभाग आणि गुलाबराव देवकर मल्टी स्पेशॅलिटी हॉस्पीटल या तिघांनी सहकार्य केलेले असुन या अंतर्गत ई.सी.जी. तपासणी, बी.पी., शुगर, स्कीन, थायरॉईड, महिलांचे मासिक पाळीचे आजार व इतर तत्सम आजार यासाठी दोन्ही हॉस्पीटल मार्फत त्यांचे जे एम.डी.स्पेशलिस्ट आहे. नेत्ररोग तपासणी, असे मल्टी हे आरोग्याची तपासणी करण्यात येणार आहे. दि.१२/०८/२०२२ रोजी सर्व शहरातील शाळा व महाविद्यालयामध्ये मोबाईलचे दुष्परिणाम याबाबतचे मार्गदर्शन व प्रबोधन सर्व शाळा आणि महाविद्यालयात मुलांना करण्यात येणार आहे. तसेच दि.१३/०८/२०२२ रोजी विविध स्पर्धांचे आयोजन आहे. शहरातील सर्व शाळा व महाविद्यालय, यामध्ये ८०,००० विद्यार्थी सहभागी होणार आहे. दि.१३/०८/२०२२ रोजी महिला मेळाव्याचे आयोजन व आरोग्य शिबीर असे आयोजन करण्यात आलेले आहे. तसेच दि.१४/०८/२०२२ रोजी वृक्षरोपण हा कार्यक्रम मोठया प्रमाणावरती राबविण्याचे निर्धारीत केले असुन १९ प्रभागांमध्ये वृक्षरोपण करण्याचे कार्यक्रम घेणार आहे. यामध्ये १ ते १९ प्रभागातील विविध भागांमध्ये वृक्षरोपण करण्यात येणार असुन मेहरुण परिसरात जवळपास २००० झाडे लावण्याचा निर्धार केलेला आहे. सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये वृक्षरोपण कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. दि.१५/०८/२०२२ रोजी शाळा व महाविद्यालयामार्फत प्रभात फेरी, तिरंगा वंदन दिंडी काढण्यात येणार आहे. तसेच सर्व कार्यालयात ध्वजवंदन व संभारंभ कार्यक्रम आहेत. दि.१६/०८/२०२२ रोजी स्वातंत्र संघावर आधारीत व्याख्यान सर्व शहरातील सर्व शाळा व महाविद्यालय मनपा प्रशासकीय इमारतीवर याचे आयोजन केलेला असुन त्यानंतर सायकल स्पर्धेचे दि.१६/०८/२०२२ ला आयोजन केलेले आहे. याच्यामध्ये जळगांव शहराचा इतिहास, स्वातंत्र्याचा इतिहासाबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. दि.१७/०८/२०२२ रोजी सर्व शाळांमध्ये भारतीय स्वातंत्र्यावर आधारीत चित्रपट प्रत्येक शाळेत दाखविण्यात येणार आहे. तसेच दि.१७/०८/२०२२ रोजी स्वराज्य महोत्सव आणि हर घर तिरंगा या सांस्कृतिक कार्यक्रमाचे समारोप कारणामुळे दि.१७/०८/२०२२ रोजी मनपाचे सर्व सन्मा.पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी यांनी प्रभातफेरी व दिंडीचे आयोजन केलेले असुन सदर प्रभातफेरीचे आयोजन मनपा प्रशासकीय इमारती पर्यंत झाल्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम देशभक्तीवर गीत गायन कार्यक्रम तसेच जळगांव व्याकोलिक देशाचे स्मरण हा मनपा प्रशासकीय इमारतीमध्ये संध्याकाळी ६.०० वाजता आयोजन करण्यात आलेला आहे. सर्व शासन निर्णयानुसार ज्या ज्या तारखेला उपक्रम करण्याचे निर्धारीत केलेले होते. त्यानुसार आपण आयोजन केलेला आहे. सर्व अधिकारी कर्मचारी तसेच सर्व सन्मा.सदस्य लोक प्रतिनिधी तसेच सर्व नागरीक यामध्ये मोठया संख्येने सहभागी होऊन आपल्या आजादी का अमृत महोत्सवामध्ये सर्व नागरीकांनी मोठया संख्याने उपस्थित राहवे. धन्यवाद.

**मा.महापौर :-** महानगरपालिकेला दि.३० जुन २०२२ रोजी शासनाचे पत्र प्राप्त झाले. त्यामध्ये दि.०८ ऑगस्ट २०२२ रोजी विशेष महासभा आयोजित करण्याचे निर्देश हे दिलेले आहे. हे निर्देश प्रत्येक महापालिकेला आलेले असतांना सुध्दा फक्त धुळे आणि जळगांव महापालिकांनी शासनाच्या निर्देशानुसार आपण या विशेष महासभेचे हर घर तिरंगा, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या विषयावर या विशेष महासभेचे आयोजन केलेले आहे. विशेष महासभा असल्यामुळे या विशेष महासभेमध्ये सर्व सन्मा.सदस्य, सर्व अधिकारी वर्ग, सर्व कर्मचारी वर्ग हे पोशाखामध्ये उपस्थित झालेले आहे. त्याप्रमाणे आपण फ्लॅगचे ब्रॉच सुध्दा प्रत्येकाला लावलेले आहे. आणि अतिशय सुंदर वातावरण याठिकाणी या सभागृहामध्ये तयार झालेला आहे. मी त्या बद्दल सर्व सन्मा.सदस्य सर्व अधिकारी वर्ग, सर्व कर्मचारी वर्ग यांचे अभिनंदन सुध्दा करते आणि कौतुक सुध्दा करते आणि टाळया वाजवुन त्यांचे सगळयांचे स्वागत सुध्दा करते. आता आपल्याला या ठिकाणी गोसावी साहेबांनी पुर्ण शासनाच्या निर्देशानुसार ९ तारखेपासुन ते १७ तारखेपर्यंत काही उपक्रम आहे जे आपल्याला आपल्या प्रभागांमध्ये त्यांचे आयोजन करायचे आहे. त्यामध्ये सर्व नगरसेवकांनी उपस्थित राहायचे आहे आणि भाग घ्यायचे आहे. परंतु नागरीकांचा सहभाग कसा वाढेल आणि नागरीक सुध्दा कश्या प्रकारे जास्तीत जास्त इनवाल होतील. त्यासाठी सगळयांनी प्रयत्नशील राहायचे आहे. त्याचा पुर्ण आराखडा आणि कोणत्या प्रभागामध्ये कोणता कार्यक्रम किती तारखेला आहे. या सगळयांचे परिपत्रक आपल्याला दिले गेलेले आहे. आणि आपल्या भारत देशाला ७५ वर्ष पुर्ण झाल्याचे हे अमृत महोत्सवी हे वर्ष आहे. आणि या ७५ व्या वर्षी आपल्याला आपण याचे मालकरी व्हावे. यासाठी या विशेष महासभेमध्ये मला असे वाटते की, इतिहासातील काही गोष्टींना उजळ देण्याची आवश्यकता आहे. इतिहासात घडलेल्या काही गोष्टी आणि आजची परिस्थिती आणि उद्याची परिस्थिती ही कशी असावी. आपण त्या संदर्भात कश्या प्रकारचे योगदान दिले पाहिजे. त्या संदर्भात थोडक्यात माहिती मी या ठिकाणी मांडणार आहे. भारतीय स्वातंत्र्याचा येत्या १५ ऑगष्ट २०२२ रोजी ७५ वर्ष पुर्ण होत आहेत. आपण सर्वजण 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' मोठया उत्साहाने मनोभावे साजरा करीत आहोत. 'वंदे मातरम्' तसेच 'भारत माता की जय' ही घोषणा देत असतांना आपले मन प्रफुल्लित होते. राष्ट्रीयत्व प्रत्येकात आहे ते जागृत होते. हे जरी सत्य असले तरी आपल्याला स्वातंत्र्याचा अर्थ आणि परमार्थ याचबरोबर पंच्याहातरीतील सत्य शोधण्याची आणि चिंतन करण्याची आवश्यकता आहे. 'तसे आपण सर्वजण भाग्यवानच' कारण मला आणि आपल्या सर्वांना स्वातंत्र्याचे फळे चाखण्याची संधी मिळाली, परंतु भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्ष पुर्ण होत असतांना सर्व भारतीयांच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत रहाव्यात, स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या विविध घटनांचे स्मरण व्हावे, देशभक्तीच्या भावना कायमस्वरुपी स्मरणात रहाव्या, यासाठी भारताला असलेल्या दैदिप्यमान गौरवशाली इतिहासाचे अभिमान पुर्वक संस्मरण करणे आवश्यक आहे. स्वातंत्र्याच्या दिशेने महत्वपुर्ण आठ पाऊले याची आठवण करतांना काही गोष्टी आपल्या समोर मांडु ईच्छिते, १५ ऑगष्ट १९४७ रोजी भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळाले. या स्वातंत्र्याचा अर्थ आणि परमार्थ जे राष्ट्रपिता महात्मा गांधीजींना अभिप्रेत होते. त्यामध्ये अध्यात्म हे साक्षात्कारी नव्हते. त्याला सामाजिक परिमाणे होती, समाजाची सेवा होती, निसर्गाचे रक्षण होते, जलसंवर्धन होते. सार्वजनिक आरोग्याची काळजी होती. सामाजिक विषमता अर्थात गरिबी - श्रीमंती यातील दरी कमी व्हावी. अन्यायाच्या विरुध्द लढा अशा अनेक बाबींवर आधारित हे आठ महत्वपुर्ण घटनाक्रम मी आपल्यासमोर मांडण्याचा प्रयत्न करीत आहे.

१) १९०५ साली बंगालची फाळणी झाली. त्यावेळी संपुर्ण राष्ट्राची एकता दिसली. 'वंदेमातरम्' चा पहिला मंत्र तदनंतर दिला गेला. यासंदर्भात १९३९ मध्ये 'हरिजन' या मासिकामध्ये लिहिले आहे की, फाळणीनंतर संपुर्ण देशात धर्म, पंथ, जात-पात विरहित 'वंदेमातरम्' चा नारा हा सर्वात बलाढ्य नारा म्हणुन नावारुपास आला.

२) १९१७ साली सत्याचा पहिला विजय झाला. तो म्हणजे चंपारणचे सत्याग्रह. सत्याग्रहाच्या स्वरुपात संपुर्ण राष्ट्राला हे अचुक शस्त्र प्राप्त झालेले होते.

३) १९१९ साली 'जालियानवाला बाग हत्याकांड' घडले. हत्याकांड इंग्रजांनी घडविले आणि या हत्याकांडामुळेच इंग्रज हे घृणेस पात्र ठरले. त्याचा वचपा काढण्यासाठी क्रांतिकारक उधमसिंह यांनी इंग्रज माजी लेफ्टनंट गव्हर्नर ओ.डायर यांची हत्या केली.

४) १९२० साली बापुंनी 'असहकार चळवळी' चा नारा दिला. यात संपुर्ण देश इंग्रजांच्या विरोधात उतरलेत. गाव-खेड्यातील कष्टकरी संपावर गेलेत. तर १९२१ मध्ये शेकडो संप झालीत.

५) ३ फेब्रुवारी १९२८ मध्ये लाला लाजपत राय यांचा 'सायमन गो बॅक' या चळवळीत लाठीचार्ज मध्ये मृत्यु झाला. त्यांच्या हत्येस जबाबदार असलेल्या इंग्रज अधिकारी सँडर्स याची पंजाबमध्ये भगतसिंह व राजगुरु यांनी हत्या केली. एवढेच नव्हे तर पंजाब असेम्बलीमध्ये त्यांनी बॉम्बही फेकला आणि म्हणुनच १९३१ मध्ये भगतसिंह व राजगुरु यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. या फाशीमुळे संपुर्ण देश एकवटला.

६) १९३० साली 'दांडी यात्रे' ने संपुर्ण देशात जागृती झाली. संपुर्ण स्वराज्याच्या घोषणेने संपुर्ण देशात एकतेची भावना निर्माण झाली. याचवेळी ९५ हजार आंदोलकांना कैद करण्यात आले.

७) १९४२ मध्ये 'तुम मुझे खुन दो, मै तुम्हे आजादी दुँगा' या घोषणेने सारा देश जागरुत झाला, पेटुन उठला. त्या आजाद हिंद सेनेचे ८५ हजार सैनिक ज्यामध्ये हिंदी, मराठी, बंगाली, पंजाबी आदी सर्वच जण होते यांचे नेतृत्व करणारे नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी १४ ऐप्रिल १९४४ रोजी देशाचा ध्वज फडकवला.

८) ८ ऑगष्ट १९४२ रोजी 'भारत छोडो आंदोलना' ची सुरुवात झाली. महात्मा गांधीजींनी दिलेला मंत्र 'देशाचा निश्चय करा किंवा मरा' हा सर्व देशवासियांच्या हृदयात पक्का झाला.

या आठ घटना आपणास सर्व राष्ट्रभक्तांच्या बलिदानाची आठवण करुन देणारे ठरतात. या स्वातंत्र्य लढ्याच्या काळात जळगांव शहर आणि जळगांव जिल्हा हा नेहमीच अग्रभागी आणि सक्रीय सहभागी राहिलेला आहे. याचा तुम्हा आम्हा सर्वांना सार्थ अभिमान आहे. अर्थात नुसतेच अभिमान बाळगुन चालणार नाही, तर कृतीशील व्हावे लागणार आहे. यासंदर्भातील काही आठवणी म्हणजेच आताचे 'जळगांव शहर पोलिस स्टेशन' हे पुर्वीचे न्यायालय होते. जुन्या गावातील चावडी ह्याला स्वातंत्र्य काळातील ऐतिहासिक वारसा आहे. जळगांव शहरातील 'स्वातंत्र्य चौक ' हे स्वातंत्र्यवीराचे साक्ष देणारे आहे. विख्यात विचारवंत व शिक्षणतज्ज्ञ गुरु चरणदास म्हणतात, 'राष्ट्राचा प्रवास हा विहंगमावलोकन करण्याचा दिवस म्हणजेच १५ ऑगस्ट' जळगांव जिल्ह्यामध्ये अनेक आंदोलने झाली. स्वातंत्र्याचे लढे झालेत. स्वातंत्र्य सैनिकांनी आपले योगदान दिलेत. याची गौरवगाथा थोर स्वातंत्र्यसैनिक मग त्यामध्ये धनाजी नाना चौधरी, लेले काका, गोविंद दगडु सोनवणे, दत्तात्रय गणेश काळे, गोविंदा नायर, वसंत भागवत, केशव आंबेडकर, सदाशिव हरि नारखेडे, श्रीमती अनाबाई जोग, सुभानराव पाटील, चावदस दला भोळे, राधाबाई देशपांडे, मीर अकबर अली मीर शुक्रुल्ला, आत्माराम अत्रे गुरुजी, जयनारायण वर्मा, वसंतराव शर्मा, निर्मल सारस्वत, दत्तात्रय गंधे, वासुदेव कुलकर्णी, माधवराव इंगळे यांच्यासह हजारो सैनिकांनी या लढ्यात योगदान दिलेत. याचबरोबर जळगांव जिल्ह्यातील फैजपुर, नांद्रे बु.॥ कानळदा, एरंडोल, धरणगाव, अमळनेर, बोदवड, पारोळा,चोपडा, भुसावळ, यासह इतर सर्वच गावे लढ्यामध्ये सक्रीय होती आणि त्याच्या पाऊलखुणा या प्रत्येक ठिकाणी इतिहासाची साक्ष देत आजही जिवंत आहे. वेळ आहे त्या पाहण्याची, त्यांच्याविषयीची पुस्तके वाचण्याची, त्यांच्याविषयी ऐकण्याची. ज्यामुळे या समाजातील 'लोकशाहीचे जगले' ज्यांनी व्यवस्थेत समाजात काही विधायक बदल घडवुन आणण्यासाठी अनेकांनी आजवर संघर्ष केला. रस्ता सोपा नव्हता, तरीही त्यांचा प्रवास थांबला नाही. प्रसिध्दीपासुन ते चार हात लांबच राहिलेत. स्वातंत्र्याच्या आणि परिवर्तनाच्या दिशेने त्यांची वाटचाल सुरुच होती. हे खरे 'लोकशाहीचे जगले' गत ७५ वर्षामध्ये आम्ही अनेक गोष्टी /बाबी अनुभवल्या. त्यामध्ये १९९० नंतरचे खासगीकरण उदारीकरण आणि जागतिकरणाचा बोल-बाला सुरु झाला. अर्थात यामुळे लोकसहभागातुन घडणाऱ्या चळवळी मागे पडल्यात. खेडयांच्या स्वयंसंपुर्णतेचा ध्यास आम्ही घेतला. माहितीचा अधिकार दिला. संगणक व वाय-फाय खेडो-पाडी पोहोचविले. असंघटितांचे जीवनमान उंचावले. वंचितांना शिक्षण प्रवाहात आणले. शिक्षणाचा साचा बदलला. लोककलेला प्राधान्य दिले. देशी खेळांना प्रोत्साहन दिले. पाण्यावर प्रत्येकाचा हक्क आहे ही भावना निर्माण केली. समृध्द पर्यावरणासाठी आग्रही राहिलोत. आरोग्यासह सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले. ग्रामसभा, नियोजनातुन निर्मितीकडे आणि समृध्दीकडे अशा अनेक बाबी जरी केलेल्या असल्या तरी. आज आवाहन आहे 'दुसऱ्या स्वातंत्र्याचे' कारण संकट येणे हे गंभीर नाही. परंतु आलेल्या संकटाचा मुकाबला करण्यासाठी तितक्याच गांभीर्याने पाऊले उचलली जात नसतील तर परिस्थिती अधिक गंभीर बनते हे वास्तव आहे. स्वातंत्र्य मिळाले त्यावेळेला देशाला चौदा शे मेगावॉट वीज लागत होती. २०१३ साली तीच वीज वीस हजार नऊ शे

मेगावॅट लागत होती आणि आज २०२२ मध्ये सुमारे २९ हजार मेगावॅटच्या विजेची आवश्यकता आहे. भारताच्या गतीमान विकासासाठी, मार्गाला जोडण्यासाठी रस्तेबांधणीतुन भारत निर्माण होत आहे. यात खुप काम करावयाचे आहे. अभिव्यक्तीची गळचेपी होत असल्याची ओरड ही अनेकदा समाजमनातुन उमटुन आलेली आहे. लायसन्सवाद / इन्स्पेक्टर राज अजुनही संपलेला नाही. राज्यघटना ही लोकांपर्यंत पोहोचविणे अत्यंत आवश्यक आहे. गरीब समाजामध्ये स्वयंशिस्त व स्वयंप्रशासनाचा अभाव दिसतो. स्वतंत्र भारतातील परतंत्र स्त्री हिची अजुनही सुटका झालेली नाही. आजही कौटुंबिक, हुंडाबळी, ॲसिड हल्ले, लैंगिक शोषण, बलात्कार इत्यादीची ती बळी ठरत आहे. तरुण व उर्जावान भारताच्या युवकांसाठी रोजगार निर्माण करुन बेरोजगारीवर मात करणे, भ्रष्टाचाराला आळा घालणे इंडिया आणि भारत यातील भेद-नष्ट व्हायला हवा. जिंदा शहीद मनींदरसिंह बिट्टा असं म्हणतात, 'अजुनही राजकीय दहशतवाद संपलेला नाही.' मिडिया पारदर्शक व लोकाभिमुख होणे अत्यंत आवश्यक आहे. क्रिडा व संस्कृतीचा ऱ्हास हा रोखायला हवा. डिजीटल स्वातंत्र्य हे आपणास प्राप्त करावयाचे आहे. राईट टु रिकॉल, पर्यावरणाच्या समस्या, सशक्त लोकायुक्ताची गरज, विकासाची व्याख्या बदलण्याची आवश्यकता आहे. जात-पात व वंशवाद दुर ठेवण्याची गरज, शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी करण्याची आवश्यकता, ही आवाहने आहेत. याचबरोबर २०१० मध्ये तत्कालीन महामहिम राष्ट्रपती सौ.प्रतिभाताई पाटील यांनी राष्ट्राला संबोधित करतांना आपल्या अभिभाषणात 'नक्षलवादी, महागाई, दुसऱ्या हरित क्रांतीची गरज, काश्मीर खोऱ्यामधील तणावपुर्वक असलेली शांतता, हे सर्व विषय अजुनही प्रभावीपणे सोडविण्याची आवश्यकता आहे.' असे म्हटले होते. लोकशाहीचे रक्षक आणि सरकार हे जरी प्रयत्न करीत असले तरी समाजाने कटु सत्य स्विकारत बलशाली भारतासाठी मनमुक्त स्वातंत्र्यासाठी, सोशल स्वातंत्र्यासाठी, देशातील राजकारण्यांना उघडपणे आपण किती शिव्या देऊ शकतो यापेक्षा किंवा ग्लास अर्धा कुणामुळे भरलेला आहे त्यावरील चर्चा मंथन पेक्षा स्वत:चे योगदान देण्याची अत्यावश्यक गरज आहे. आपल्या देशात सध्या आदर्शाची कमतरता भासु लागली आहे. ती पुर्तता करण्याची जबाबदारी स्वत:च्या कार्य व कृतीतुन, मातृभाषेतुन पुर्ण करण्याची आवश्यकता आहे. १५ ऑगस्ट भक्तिभावाने ओतप्रोत भरलेला आहे. चला, संकल्प करुया 'बलसागर भारत होवो' यासाठी !जय हिंद ! भारत माता की जय ! धन्यवाद. दि.१७ ऑगस्ट २०२२ रोजी आपण मनपा अधिकारी कर्मचारी आणि सर्व सन्मा.नगरसेवक यांची स्वातंत्र चौकापासुन प्रभातफेरी निघणार आहे. सॉरी मनपा इमारतीपासुन सुरुवात होणार आहे. ज्याच्यात सन्मा.नगरसेवक, अधिकारी कर्मचारी यांनी सगळयांनी महापालिकेमध्ये ठिक ५.०० वाजता जमा व्हायचे आहे. तेथुन आपली रॅली निघेल तर ती छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते चित्रा चौक ते टॉवर तेथुन पुन्हा आपल्या महापालिकेत यायचे आहे. आणि त्यानंतर त्याच दिवशी ६.०० वाजता आपल्या इमारतीमध्ये स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार आपण ठेवलेला आहे. आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन आपण केलेले आहे. तर त्याला सुध्दा आपली उपस्थिती ही प्रार्थनिय आहे. त्यामुळे सर्व सन्मा.नगरसेवक अधिकारी कर्मचारी, सर्व पदाधिकारी हे १००% उपस्थित राहतील याची सगळयांनी नोंद घ्यायची आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** स्वातंत्र्य सैनिकांची यादी तयार केली आहे का ? कारण मागे मी पण एक पुस्तक लिहणार होतो मला ती माहिती मिळविण्यासाठी, फार कमी आहे. आपल्याला ७५ वर्ष झाले आणि ते त्या वेळेस १५,१६,१७,१८ वयाचे असतील, म्हणजे त्यांचे वय आज ९१,९२ असेल ना. केली आहे का तुम्ही ? हो हो याद्या तर आहे पण ते लोकं सापडायला पाहिजे. ते सापडायला महत्व आहे.

**मा.महापौर :-** या अमृत महोत्सवी सन्मा.नगरसेवकांमधील कोणाला आपले विचार मांडावयाचे असतील तर आपण मांडु शकतात. यासाठी मी आपले सन्मा.नगरसेविका सौ.शुचिताताई यांना विनंती करते की, त्यांनी आपले विचार मांडावे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आयुक्त महोदया, उपमहापौर साहेब आणि माझे सर्व सन्मा.नगरसेवक बंधु आणि बघिणी आणि महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी आज भारताच्या अमृत महोत्सवी प्रशासनानिमित्त ही विशेष महासभा आहे. आणि आजच्या विशेष महासभेचे प्रशासनाने नेवनेटके आयोजन केलेले आहे. त्या बद्दल सर्व प्रथम मी प्रशासनाचे अभिनंदन करते. आपणास सगळयांना माझ्या वतीने अमृत महोत्सवी वर्षाचे शुभेच्छा देते. महापौरताईंनी येथे आपले मनोगत मांडले, त्या मनोगतामध्ये इतिहासाचा माहोल घेण्याचे छान प्रयत्न केले. मला वाटते आपण हर घर तिरंगा ही जी मोहीम राबवत आहे. या मागचे उद्दिष्टच हे आहे की, येणाऱ्या पिढीला आपल्याला देशप्रेमाच्या भावनेशी जोडुन घ्यायचे आहे. आजची जी पिढी आहे आपण सगळेच. आपल्याला

स्वातंत्र्य हे आयते मिळालेले आहे. त्या स्वातंत्र्यासाठी आपल्यापैकी फार कमी जण असतील आज की, जे स्वातंत्र्य काळापासुन होते आणि त्यांनी स्वातंत्रासाठीचा लढा दिलेला आहे किंवा ती सुध्दा पिढी आता संपायला आली की, आता त्या लढ्याचे परिणाम वैयक्तीक ज्यांनी भोगले. आपल्या पिढीला स्वातंत्र्य आयते मिळाले आणि अर्थातच जसे म्हटले जाते की, सहजपणे मिळालेली वस्तुचे मोल राहत नाही. आणि तसेच त्यांचे होतांना दिसत आहे. आमच्या पिढीनंतर म्हणजे आमची मुले, आमच्या मुलांमध्ये देश प्रेमाची भावना उगवणे हे मला वाटते आमचेच कर्तव्य आहे. आणि त्यासाठी आम्ही हा अमृत मोहत्सवी वर्षाचे कार्यक्रम आयोजित केलेले आहे. केंद्र शासनाला मी खुप खुप धन्यवाद देईल. मोदीजी आणि अमितभाई शहा यांच्या संकल्पनेतुन जो हा अमृत मोहत्सवी वर्षाचा कार्यक्रम तयार झालेले आहे. हर घर तिरंगा आणि स्वराज्य उत्सव या ज्या संकल्पना समोर आलेल्या आहेत. खरं म्हटले तर यापुर्वी जी ध्वजसंहिता होती. त्यामुळे सामान्य नागरीकाला ध्वजारोहन करण्याचे ध्वज फडकविण्याचे अधिकार नव्हते. पण सामान्यांना आज या देशप्रेमाच्या भावनेशी अधिक चढवढ करुन जोडुन घेण्यासाठी नविन ध्वजसंहिता तयार करण्यात आली. आणि ज्या योगी आपल्याला आता हे सहज साद्य होणार आहे की, प्रत्येक घरावर आपण तिरंगा फडकाऊ शकणार आहे. अर्थातच त्याचा खुप चांगला परिणाम होणार आहे. जसे आपण बघतो की, आताची पिढी ही इव्हेंटकडे जुडणारी पिढी आहे. या लोकांना असे सेलिब्रेशन हवे असते. उत्सवी पिढी आहे. या उत्सवी पिढीला आपल्याला याच्यात सामावुन घ्यायचे आहे. अर्थातच स्वराज्य उत्सवाचे महापालिकेने जे काही नियोजन केलेले आहे. अतिशय चांगले नियोजन आहे. फक्त सुचना आणि विनंती मी येथे करेल की, नियोजन जितके छान केलेले आहे तितकेच त्यांचे इमप्लीमेंट सुध्दा झाले पाहिजे. म्हणजे प्रत्येक कार्यक्रम तितकाच यशस्वी झाला पाहिजे. आणि त्यासाठी अर्थातच सगळयांचे मनापासुन सहभाग या सगळया विषयांमध्ये असला पाहिजे. मुळात देशप्रेमाची भावना, नेशन फस्ट, हा विचार आपण कायम मनात ठेवला पाहिजे. आणि देशप्रेम म्हणजे नक्की काय ? कश्या कश्यातुन आपण देशप्रेम दाखवु शकतो. १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी आपल्याला मोठया प्रमाणावर सोशल मिडीयावर सुध्दा देशप्रमाची भावना जागृत करणारे मॅसेजेस असतील, किंवा त्या बद्दलचे लेखमाला असतील, त्या बद्दलचे व्हिडीओ असतील बाईटस असतील. हे सगळे बघायला मिळतात. पण एक सामान्य नागरीक म्हणुन माझी या देशाच्या प्रती एक जबाबदारी आहे. या देशाच्या नैसर्गीक साधन संपत्तीचे संवर्धन आणि जतन करण्याची माझी जबाबदारी आहे. ऐतिहासीक स्थळांचे विद्रुपीकरण होणार नाही. ही माझी जबाबदारी आहे. सामान्य नागरीक म्हणुन भ्रष्टाचाराला आढा घातला जाईल ही माझी जबाबदारी आहे. मी काय करतो आहे या देशासाठी, मी ज्या पदावर काम करतो. या पदाला न्याय देणे यावर प्रामाणिकपणे काम करणे, हे सुध्दा एक प्रकारे देशप्रेमच आहे. आणि या ७५ वर्षात, आजादी के ७५ साल, या अमृत महोत्सवी वर्षाकडे जेव्हा आपण वाटचाल केली. पण आपण अभिमानाने सांगावे असे वाटते की, जो स्वातंत्र्याच्या जढवढीपासुनचा विचार होता. आणितो द्यायाचा विचार की, शेवटच्या घटनापर्यंत गोष्टी पोहचल्या पाहिजे. सगळया सोईसुविधा साधन, संपत्ती पोहचली पाहिजे. आणि मला वाटते आपल्या देशात आता जी राष्ट्रपतीची नियुक्ती झालेली आहे. आदीवासी समाजाची महिला द्रौपदी मुर्मू यांची राष्ट्रपती म्हणुन जी नियुक्ती झालेली आहे. मला वाटते ही अंतोदयाचे विचार पुर्ण करणारीच नियुक्ती आहे. आणि यासाठी मी पुनश्च एकदा अभिनंदन करते. सगळयांचेच की, आपली वाटचाल चांगली सुरु आहेच. आणि अर्थाच प्रत्येकाने आपली जबाबदारी समजुन घ्यायची आहे. आपण प्रत्येकाने येथे मनापासुन शपत घ्यायची आहे की, ज्या कोणत्या पदावर काम करते.मग ती सरकारी नौकरी असेल खाजगी नौकरी असेल की, एखादी गृहीणी असेल, लोकप्रतिनिधी असेल. जे कार्य मी करीत आहे. माझ्या प्रत्येक कृतीमध्ये आधी मी देश हिताचा आणि राष्ट्रीय हिताचा विचार करणार आहे. आणि त्याला अनुसरुनच माझे रोजचे वर्तन असणार आहे. हे जेव्हा आपण प्रत्येक जण करु . तेव्हा निश्चितच फक्त अमृत महोत्सवी वर्षापर्यंत राहणार नाही. तर देशप्रमाची ही भावना आपण आपोआपच पुढच्या पिढीला पास ऑन करणार आहोत. पुन्हा सर्वांना अमृत महोत्सवी वर्षाच्या शुभेच्छा देते. आणि थांबते धन्यवाद.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** सन्मा.नरेंद्रजी मोदी आणि सर्व सरकार आणि या भारतातील सर्व नागरीक ७५ वा अमृत महोत्सव आपण साजरा करत आहे. आणि आपले स्वभाग्य आहे की आपल्याला ७५ वा अमृत महोत्सव आजादीचा, एक अनुभव एक सन्मान, आपल्यामध्ये प्रेरणा, उत्साह निर्माण होतो. गुलामी आपण बघीतली नाही, गुलामी ज्यांनी बघीतलेली आहे त्यांच्या वेदना त्यांना माहित. पण आपण आपले जो भारत हा जगा मधला सर्वात चांगला आणि लोकशाही पाडणारा देश आहे. येथील लोकशाही पुर्ण जगात कुठेही नाही. असे लोकशाही मध्ये आपण या आजादी का अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. मी कौतुक करेल की,

जळगांव शहर महानगरपालिका, महापौरताईंनी जे त्यांचे भाषण किंवा त्या इतिहासाची पुर्ववृत्ती केली आठवण केली आणि प्रशासनाचे ही करेल की, त्यांनी जो कार्यक्रम ८ तारखेपासुन आज पासुन ते १७ तारखेपर्यंतचे नियोजन केलेले आहे. आणि हे नियोजन करत असतांना लोक सहभाग वाढविणे हा त्याच्या पाठीमागचा उद्देश आहे. आणि लोकांमध्ये देशप्रेम जागृत करणे. ज्याप्रमाणे आपल्याकडे बरेच लोकं येतात ते आपल्याला जापानचे उदाहरण देतात की, जापानी माणुस हे पहिले देशासाठी काम करतो,त्याप्रमाणे भारतात ही जागृती व्हावी आणि देशप्रेम प्रथम राष्ट्र, जसे शुचिताताईंनी सांगितले, भावना म्हणजे देशप्रेम आहेच. जागृकता आणि अंमलबजावणी त्याच्यामध्ये होईल आणि या उद्देशाने आपण अमृत महोत्सव साजरा करीत आहे. हर घर तिरंगा आपण लोकांना लावण्यासाठी जागृत करणार आहोत की, प्रत्येकाने १३ तारखेपासुन ते १५ तारखेपर्यंत हर घर तिरंगा लावला पाहिजे. आणि याच्यासाठी शासनाने जे मार्गदर्शन दिलेले आहे की, याच्यासाठी आपल्याला जे जे आपल्याला करावे लागेल. जसे शिबीर आयोजित करा लोकांमध्ये किंवा व्याख्यान आयोजित कराल लोकांमध्ये. त्याप्रमाणे जनजागृती करावी. आणि जनजागृती करत असतांना याच्यामध्ये एक खंत मला अशी वाटली की, तीन दिवसापुर्वी आमदार श्री.राजुमामा भोळेंनी आपल्याकडे अर्ज केला आणि भारतीय जनता पार्टीने ही अर्ज केला की, हर घर तिरंगा हे दि. १३ ते १५ ऑगस्टपर्यंत लावावा.याचा जनजागृतीचा शहरामध्ये होर्डींग्स लावावे जेणे करुन वातावरण निर्मीती होईल आणि लोकांना कळेल. आजही लोकांच्या मनामध्ये जे आहेत. लोकांना असे वाटत आहे की, आजही झेंडा मला फुकट मिळणार आहे. घरी लोकं आणुन देणार आहे. जे ध्वज आहे. हा लोकांमध्ये जो मॅसेज गेलेला आहे ना किंवा लोकांनी स्वत:हुन ही देश भावना आपल्यामध्ये उजवावी आणि त्यांनी स्वत:हुन झेंडा विकत घेवुन आपल्या घरावर १३ ते १५ ऑगस्ट लावावा. तर त्याच्यासाठी जनजागृती होर्डींग्स लावणे गरजेचे होते म्हणुन आपण महापालिकेला अर्ज दिलेल होत की, विनाशुल्क आम्हाला होर्डींग्स २५ ठिकाणी लावण्याची परवानगी मिळावी म्हणुन पण प्रशासनाने पण प्रशासनाने आम्हाला सांगितले की, शुल्क भरावे लागेल.तर माझी एक विनंती होती की, असे जे राष्ट्रीय स्तरावरचे स्वच्छता अभियान असतील किंवा लोक उपयोगी काही अभियान असतील. राज्यस्तरीय लोक उपयोगी अभियान असतील. किंवा आपले महापालिकेचे काही लोकउपयोगी अभियान असतील. तर याचा शुल्क जर जनतेचे सहभाग असेल आणि जनता स्वत:हुन लावत असेल. त्याचे आपण प्रुफ मागवे. त्याच्यामध्ये काही त्रुट्या असतील तर ते त्यांच्या निदर्शनास आणुन द्या की, ही गोष्ट याच्यामध्ये चालत नाही. त्यामध्ये आपण म्हटले होते. आपले माजी पालकमंत्री श्री.गिरीषभाऊ महाजन, आपले जळगांव जिल्ह्याचे दोन्ही खासदार आणि राजुमामा भोळे यांचे नाव टाकुण आपण ती परवानगी मागितलेली होती. तर माझे असे मत आहे की, असे कार्यक्रमाला सुध्दा आपण या गोष्टींना आपण हे केले पाहिजे की, विनाशुल्क होर्डींग्स विनाशुल्क जनजागृतीचे लावु देण्यात यावे. ही माझी सभागृहापुढे विनंती आहे. याचा जर जी.आर.वाचले तर याच्यामध्ये हेच म्हटलेले आहे. याच्यासाठी किंवा हर घर तिरंगासाठी जनजागृती असेल, लोकसहभाग असेल, होर्डींग्स लावायचे असतील.कुठे पथनाटय करायचे असतील किंवा काय असेल, तर हे करावे. शासनाने आपल्या परिपत्रकातच म्हटलेले आहे. आणि आपण जे कार्यक्रम करत आहे. ऐवढे मी बोललो. आपण जे महापालिका कार्यक्रम करत आहे. प्रशासनाचे खरंच अभिनंदन करेल.कौतुक करेल. फक्त सन्मा.सदस्यांना माझी विनंती आहे की, सर्व सन्मा.सदस्यांनी आपल्या जवळ जवळ जास्तीत जास्ती कार्यक्रमात स्वत:हुन सहभागी व्हावे ही माझी या सभागृहात विनंती आहे. धन्यवाद.

**श्री.शाम गोसावी, अति.आयुक्त :-**९२३०४ आपल्या मालमत्ता आहेत. आणि मोस्ट ऑफ दी मालमत्तांवरती हे झेंडे.

**श्री.कैलास सोनवणे :-** ९२००० मालमत्ता आहे का?

**श्री.शाम गोसावी, अति.आयुक्त :-** ९२३०४ मालमत्ता आहेत. आणि शाळांमध्ये विद्यार्थी संख्या ८०,००० च्या घरामध्ये असुन शाळेमध्ये सुध्दा प्रत्येक घरावर तिरंगा ध्वज उभारण्याबाबतचा आपली प्रोव्हीजन आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** एक एक नगरसेवकाने ५००-५००,६००-६०० जरी लावले तर आपले जळगांवचे नाव होईल.

**श्री.सुनिल महाजन :-** वार्डामध्ये नगरसेवकांनी करुन घ्यावे.

**श्री.कैलास सोनवणे :-** चार आहे ना चारहींनी ५००-५०० देवुन टाकायचे, २०००-२००० हे प्रत्येक वार्डात, ४०००० तर हेच होऊन जातील. काही जास्त खर्च त्याला लागणार नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आप्पा आपल्याला नागरिकांकडुनच आवाहन करायचे आहे.

**मा.महापौर :-** नाही. आपल्याला शासनाकडुनच निर्देश आहे की, नागरीकांनी ते झेंडे विकत घेतले पाहिजे.

**श्री.सुनिल महाजन :-** वरतुन शासनाचे निर्देश आहे की, नागरीकांनी झेडे विकत घेतले पाहिजे.

**श्री.कैलास सोनवणे :-** जे लावतील नागरीक त्यांना लावु द्या. आपल्याकडे ठेवा जो आला त्याला द्या.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आपण वाटले तर नगरसेवक म्हणुन त्यांना झेंडे उपलब्ध करुन द्या मुबलक प्रमाणामध्ये.नागरीकांचा सहभाग महत्वाचा आहे.

**श्री.शाम गोसावी, अति.आयुक्त :-** शासनाने सर्व अधिकाऱ्यांनी स्वत: विकत घेऊन त्याची उभारणी करायची आहे. जे नागरीक विकत घेवु शकत नाही. अश्यांकरीता ध्वज दान करण्याची संकल्पना सुध्दा मांडलेली आहे. जो व्यक्ती ध्वजदान करणार आहे. त्याची ही नांवे आपल्याकडे ठेवायचे आहे. आणि वार्डवाईज किती करणार आहे ते सांगायचे.

**डॉ.श्री.अश्विन सोनवणे :-** साहेब.

**श्री.शाम गोसावी, अति.आयुक्त :-** शासनाच्या निर्देशाप्रमाणे ध्वज सुध्दा येतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विशेष सभेचे आयोजन केल्याचे दिसुन येत आहे. राज्य शासनाने जे जे काही निर्देशन दिलेले आहेत. प्रशासन आणि मा.महापौरताईंनी सभागृहासमोर विशेष केलेले आहे. निश्चितपणे संपुर्ण सभागृह या विषयाचे गांभिर्य घेऊन आजादीचा ७५ वा अमृत महोत्सव अत्यंत उत्साहाने सादर करण्याच्या दृष्टीकोणातुन निश्चितपणे प्रयत्नशिल राहील अशी या कार्यक्रमाबद्दल मी माहिती घेतलेली आहे.

**मा.आयुक्त :-** मा.उपमहापौर, अधिकारी आणि कर्मचारीसह पत्रकार बंधु, सर्व प्रथम सर्वांना अमृत महोत्सवाच्या खुप खुप शुभेच्छा. सर्व सन्मा.सदस्यांना माझी नम्र विनंती आहे सर्व कार्यक्रमांमध्ये आपणास सहभागी व्हायचे आहे. यामध्ये विशेष कार्यक्रम म्हणजे ज्यामध्ये आपली उपस्थिती अत्यंत प्रार्थनिय आहे. उद्या ११.०० वाजता सुट्टी आहे परंतु राष्ट्रीयगीत आपल्याला म्हणायचे आहे. त्यासाठी सर्व सन्मा.सदस्यांना मी विनंती करेल की, कृपया आपण १०.३० पर्यंत कार्यक्रमात यावे. पार्कीगमध्ये आपण राष्ट्रगीत म्हणणार आहोत. त्यानंतर ११ तारखेला आपली मॅरेथॉन आहे सकाळी ६.०० वाजता. तर माझी विनंती आहे की, सर्व महिला सन्मा.सदस्यांनी सुध्दा या मॅरेथॉनला नक्की सहभाग घ्यावा. जास्तीत जास्त जनसहभागातुन आपण हे कार्यक्रम करत आहोत. तर सकाळी ६.०० वाजता आपली मॅरेथॉनची रॅली आहे. आपल्या महापालिकेवरुन स्वातंत्र्य चौक ते परत महानगरपालिका, त्यानंतर १६ तारखेला सायकलची मॅरेथॉन आहे सकाळी ६.०० वाजता. तेथे सुध्दा सगळयांचे सहभाग आवश्यक आहे. समारोप आपण आपल्या दिंडीने करणार आहोत. या दिंडीचा उद्देश असा होता की, स्वराज्य रॅली असेल. सायंकाळी मुद्दाम आपण ठेवलेली आहे सायंकाळी ५.०० वाजता, सर्व सन्मा.सदस्यांनी राष्ट्रीय पोशाखात यावे असे मी त्यांना विनंती करेल. माझे सर्व कर्मचारी, जी आपली रॅली असेल.महापालिका ते शिवाजी महाराजांचा पुतळा ते चित्रा चौक ते टॉवर चौकातुन परत महानगरपालिकेकडे आणि संध्याकाळी आपण सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. यामध्ये आपले काही पालक असतील ज्यांना चांगले गायन येत असेल किंवा कर्मचारी सदस्य हे सहभागी होऊ शकतात. हर घर तिरंगा जसे विशालभाऊंनी सांगितले, काही संभ्रम आहे, तर असे आहे सर की, आपण जनसहभागातुनच ध्वज घ्यायचे आहे. शासकीय निधी आपल्याला याच्यातुन खर्च करायचा नाही. तर जास्तीत जास्ती जनजागृती करुन आपल्याला नागरीकांना प्रोस्ताहीत करायचे आहे की, आपण तिरंगा खरेदी करावे. यासाठी आपण बचतगटाचे स्टॉल्स उपलब्ध करणार आहोत. खाली आपण आपला महानगरपालिकेचाही स्टॉल बचतगटामार्फत उपलब्ध केलेले आहे. रु३५ पासुन ते रु.७५, रु१५०, रु.५००/- असे विविध आकारणीचे आपण तिरंगे उपलब्ध करुन दिलेले आहे. मी सन्मा.सदस्यांना विनंती करेल. जसे आप्पा म्हणाले की, आपण सगळयांनी जमा करावे. महापालिका विकत घेऊ शकत नाही सर, तर माझी सर्व सन्मा.सदस्यांना विनंती आहे की, आपल्या वार्डातील किमान ५०० ते १००० नागरीकांना आपण तिरंगा घेऊन द्यावे. आणि आपल्या घरी लावण्यासाठी त्यांना प्रोत्साहीत करावे.जसे गोसावी साहेबांनी सांगितले की, ९२००० प्रॉपर्टी पैकी, आपण १ लाख तिरंगे लावण्याचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. त्यापैकी ६५००० आपल्याला शासन उपलब्ध करुन देणार आहे. म्हणुन याची नोंद आपल्याला ठेवायची आहे की, कोन्ही किती विकत घेतले, आणि त्यापैकीचे जे वापरले नसतील ते परत करायचे आहे.ध्वजसंहितेबाबत मॅडमांने सांगितलेले आहे. परंतु सोप्या भाषेत सांगते की, १३ तारखेला सकाळी ध्वज लावायचे आहे. दोनच प्रिकॅशन घ्यायचे आहे. तो उलटा लावु नये. वरती भगवा खाली हिरवा रंग असला पाहिजे. प्लास्टीकचे ध्वज वापरु नये. १५ तारखेला सायंकाळी उतरवुन घ्यायचे आहे. घडी करुन आपल्या घरामध्ये ठेवायचे आहे. तो कचरा कुंडीत किंवा पायाखाली येणार नाही याची आपल्याला दक्षता घ्यायची आहे. जसे आपण गुढी उभारतो आणि आपल्या घरात प्रसन्न वातावरण असत. त्याच पध्दतीने हा तिरंगा आपल्या

घरी उभारून आपल्या देशाचे प्रसन्न वातावरण आपल्याला तयार करायचे आहे. मला जळगांवकर आणि सर्व सन्मा.सदस्यांवर विश्वास आहे की, आपण नक्कीच हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडु आणि जळगांवचे नांव अजुन उज्वल करु. धन्यवाद.

**मा.महापौर :-** परिपत्रकानुसार स्वातंत्र्याचे अमृत महोत्सव, हर घर तिरंगा व स्वराज्य महोत्सव या उपक्रमाबाबत शासनाच्या परिपत्रकानुसार प्रशासनाने सदर संपुर्ण कार्यक्रमांची कार्यवाही करुन विशेष महासभेतील विषय क्र.०१ ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येत आहे. विशेष महासभेची येथे सांगता होत आहे. आता आपण राष्ट्रगीतला सुरुवात करु.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्याअनुषगांने ठराव क्रं.८५९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्ष पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर जळगांव शहरात "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत "हर घर तिरंगा" व "स्वराज्य महोत्सव" उपक्रम राबविणेबाबत शासन निर्देशाप्रमाणे दि.९ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट या कालावधीमध्ये शहरात विविध उपक्रम राबविणे व दि.१३ ते दि.१५ ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये "हर घर तिरंगा" उपक्रमांतर्गत शहरातील प्रत्येक शासकीय व निमशासकीय व खाजगी आस्थापनावर तसेच प्रत्येक घर इमारतीवर राष्ट्रध्वजाची उभारणी यासारखे उपक्रम स्वयंस्फूर्तीने करावयाचे असल्याने मनपा सदस्यांना माहिती देणेकामी तसेच त्यांनी आपआपल्या प्रभागामध्ये स्वयंस्फूर्तीने विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणेस जनजागृती करणे कामी -

१) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण ८२२२/प्र.क्र.११० (भाग-२)/ सां.का.४, दि.२० जून २०२२,
२) शासन निर्णय क्र.संकीर्ण ८२२२/प्र.क्र.१६१/सां.का.४,दि.३० जून २०२२
३) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण ८२२२/प्र.क्र.११०(भाग-२) /सां.का.४, दि.२० जुलै २०२२

शासन निर्णयान्वये "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत "हर घर तिरंगा" व "स्वराज्य महोत्सव" उपक्रम राबविणेबाबत उपरोक्त शासन निर्णयांची माहिती घेतली. प्रशासनाने सदर शासन निर्णयात दिलेल्या निर्देशानूसार अंमलबजावणी करण्याची कार्यवाही करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने उक्त महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय व परिपत्रकाच्या अनुषंगाने दि.०८/०८/२०२२ ते दि.१७/०८/२०२२ पावेतो दररोज लोकसहभागातून आयोजित केलेल्या कार्यक्रमाची माहीती व त्याची रुपरेषा सभागृहाला सांगितली व आयुक्त यांनी शासन निर्णय व परिपत्रकानुसार सर्व सन्मा.सदस्यांना आयोजित केलेल्या सर्व कार्यक्रमामध्ये सहभागी होणे बाबत विनंती केली.

सदर "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत "हर घर तिरंगा" व "स्वराज्य महोत्सव" जळगांव शहरात राबविणेकामी सन्मा.सदस्यांनी सुध्दा उत्स्पूर्सपणे सहभागी व्हावे व आपआपल्या प्रभागामध्ये स्वयंस्फूर्तीने विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करावे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**मा.महापौर :-** नगरसचिवांनी राष्ट्रगीतला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांनी राष्ट्रगीतसाठी उभे राहावे ही विनंती.

**सही/-**
**(महाजन जयश्री सुनिल)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**